**(REVISED COURSE)** QP Code :**50820**

(३ तास) [ एकूण गुण : १००

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.
(२) विवक्षित पुस्तकांच्या संदर्भातील प्रश्नांची उत्तरे लिहिताना लेखकाच्या इतर पुस्तकांची योग्य ती उदाहरणे देणे आवश्यक आहे.

१. (अ) विशेष लेखकाभ्यास ही संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) तुम्ही अभ्यासलेल्या विविध साहित्यकृतींतून अभिव्यक्त होणाऱ्या जयवंत दळवी यांच्या वाङ्मयीन विशेषांचा साधार परामर्श घ्या.

२. (अ) जयवंत दळवी यांच्या 'अंधाराच्या पारंब्या' या कादंबरीच्या आधारे एकूणच त्यांच्या कादंबऱ्यातून व्यक्त होणारा स्त्री–शोषणाविरोधी सूर उलगडून दाखवा.

**किंवा**

(ब) "जयवंत दळवी यांच्या 'अंधाराच्या पारंब्या' या कादंबरीतून तत्कालीन समाज परिस्थितीचे चिंतन प्रकटते." या विधानाचा परामर्श घ्या.

३. (अ) "'संध्याछाया' या जयवंत दळवी यांच्या नाटकातून म्हातारपणातील एकटेपणाचे प्रत्ययकारी चित्रण आढळते." या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

(ब) नाटककार म्हणून जयवंत दळवींचे जावणारे विशेष 'संध्याछाया' या नाटकाच्या संदर्भात विशद करा.

४. (अ) "'वेचक जयवंत दळवी' या कथासंग्रहात आशयाची विविधता अभिव्यक्त होते." या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

(ब) 'वेचक जयवंत दळवी' या संग्रहाच्या आधारे कथाकार म्हणून जाणवणाऱ्या वैशिष्ट्यांचा सोदाहरण परिचय करून द्या.

५. (अ) "कोकणची बोली आणि कोकणातील माणसे यांना 'सारे प्रवासी घडीचे' या कलाकृतीतून जयवंत दळवी यांनी अजरामर केले आहे." या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

(ब) जयवंत दळवी लिखित 'सारे प्रवासी घडीचे' या कलाकृतीतून जाणवणाऱ्या वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा परिचय करून द्या.

---